# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 07/10/2023 (शनिवार) दुपार


## नागपूर परिक्षेत्रीय पोलीस क्रिडा स्पर्धा– २०२३ समारोप समारंभ आयोजित

नागपूर (ग्रामीण) पोलीस मुख्यालय, टेका नाका येथील कवायत मैदानावर नागपूर परिक्षेत्रीय पोलीस क्रिडा स्पर्धा– २०२३ चे दिनांक रविवार ०८/१०/२०२३ रोजी समारोप समारंभ आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणुन विशेष पोलीस महानिरीक्षक नागपूर परिक्षेत्र, नागपूर मा. डॉ. श्री. छेरिंग दोरजे (भा.पो.से) व प्रमुख उपस्थिती म्हणुन पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र श्री. संदिप पाटील (भा.पो.से) यांच्या उपस्थितीत संपन्न होत आहे. याप्रसंगी पोलिस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से), पोलिस अधीक्षक चंद्रपुर, श्री. रविंद्र परदेशी (भा.पो.से), पोलिस अधीक्षक भंडारा श्री. लोहित मतानी (भा.पो.से), पोलिस अधीक्षक वर्धा श्री. नुरूल हसन (भा.पो.से), पोलिस अधीक्षक गडचिरोली श्री. निलोत्पल (भा.पो.से), पोलिस अधीक्षक गोंदीया श्री. निखील पिंगळे (भा.पो.से), अपर पोलिस अधीक्षक नागपूर ग्रामीण डॉ. श्री. संदिप पखाले, सर्व उपविभागीय पोलिस अधिकारी, सर्व ठाणेदार नागपूर ग्रामीण यांची उपस्थिती राहणार आहे. पोलिस मुख्यालय नागपूर ग्रामीणचे राखीव पोलिस निरीक्षक श्रीमती प्रतिभा भरोसे यांच्या मार्गदर्शनात राखीव पोलिस उपनिरीक्षक श्री. सुनिल ताकसांडे व ६ जिल्हयातील पोलिस खेळाडु हे पथसंचलन करणार आहेत. पुढील वर्षी होणाऱ्या परिक्षेत्रीय पोलिस क्रीडा स्पर्धा सन २०२४ चे आयोजन जिल्हा गोंदीया येथे नियोजित आहे. नागपूर परिक्षेत्रीय पोलीस क्रिडा स्पर्धा– २०२३ मध्ये नागपूर ग्रामीण, चंद्रपुर, भंडारा, वर्धा, गोंदिया, गडचिरोली जिल्हयातील पोलिस खेळाडुंनी यामध्ये विविध खेळात सहभाग घेतला.

## विनयभंग

पो.स्टे. जलालखेडा :– दिनांक ०६/१०/२०२३ चे ११.०० वा. ते ११.३० वा. दरम्यान फिर्यादी ही ३ वर्षा आधी आरोपी क्र. १ राकेश पाथोडे वय २५ वर्ष, रा. तिनखेडा याला ओळखत होती फिर्यादीचे लग्न झाले तेव्हा पासुन आरोपी सोबत बोलणे बंद केले फिर्यादी व तिचा चुलत भाऊ घरात बसले होते व फिर्यादीचा पती संडासला गेला असता **आरोपी नामे– १) राकेश पाथोडे, वय २५ वर्ष २) पियुश ज्ञानेश्वर काहाते, वय २२ वर्ष दोन्ही रा. तिनखेडा** हे दोन्ही आरोपी घरात आले व आरोपी क्र. १ नि म्हटले की, फिर्यादीच्या भावाला बाहेर जा असे म्हणुन आरोपीने फिर्यादीला लज्जास्पद वाटेल असे कृत्य करून विनंयभग केला. व फिर्यादीच्या भावाने फिर्यादीच्या पतीला आवाज दिल्याने पति संडासातुन बाहेर आले फिर्यादीच्या पतीला पोटाला लाथ मारुन शिवीगाळी करुन जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीतांविरुध्द कलम ३५४, ४५२, ५०४, ५०६ भादंवी कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस नायक सुलोचना दुपारे ब. नं. ९३ या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर